# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०३
# सभा क्र.०४, दिनांक १९/०४/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. १९/०४/२०२४ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. डॉ. रविंद्र बिनवडे | – | अति.महा.आयुक्त (ज) |
| मा. पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (इ) |
| मा. सौ. योगिता भोसले–निकम | – | प्रभारी नगरसचिव |
| मा. प्रशांत वाघमारे | – | शहर अभियंता |
| मा. सौ.उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. सौ. निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकारी |
| मा. सौ. प्रतिभा पाटील | – | उपायुक्त, मालमत्ता व्यवस्थापन/सेवकवर्ग |
| मा. श्रीनिवास कंदुल | – | मुख्य अभियंता (विद्युत) |
| मा. अनिरुध्द पावसकर | – | मुख्य अभियंता (पथ) |
| मा. डॉ. भगवान पवार | – | आरोग्य प्रमुख |
| मा. संदिप कदम | – | उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन |
| मा. युवराज देशमुख | – | मुख्य अभियंता (भवन) |
| मा. अशोक घोरपडे | – | उंद्यान अधिक्षक |
| मा. संजय शिंदे | – | उपायुक्त, परिमंडळ क्र. ३ |
| मा. डॉ. संजीव वावरे | – | सहाय्यक आरोग्य अधिकारी |
| मा. सुनिल मते | – | प्रशासन अधिकारी (क.आ.क.सं.) |

## वृत्तांत कायम करणे.

मा. स्थायी समिती सभा क्र. ८९, दि. १५/०३/२०२४, सभा क्र. ९०, दि. २२/०३/२०२४, सभा क्र. ९१, दि. २८/०३/२०२४, सभा क्र. ०१, दि. ०५/०४/२०२४, सभा क्र. ०२, दि. १२/०४/२०२४ व सभा क्र.०३, दि. १२/०४/२०२४ असे एकूण ६ वृत्तांत कायम करण्यात आले.

## कार्यपत्रिकेवरील विषय

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १२**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ कार्यालयाचे नियंत्रणाखालील ढोले-पाटील, येरवडा-कळस-धानोरी, व नगररोड-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे मार्च २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.-मआ/परि.क्र.१/१६,दि.१६/०४/२०२४ चे पत्र

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र. १३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी-सहकारनगर व वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे फेब्रुवारी २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे जा.क्र.-उआप-३/१०५,दि.१२/०४/२०२४ चे पत्र

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १४**

दिनांक २५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ८७ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१८, दि.१६/०४/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२४ ते दि.१५/०३/२०२४ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.३/१७, दि.१६/०४/२०२४ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**संकीर्ण**

**विषय क्र.१६**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२३- २४ या वर्षातील संचलन तुटीपोटी मागणी करण्यात आलेली पुणे महानगरपालिकेच्या हिश्श्याची६०% रक्कम सन २०२४- २५ या आर्थिक वर्षात समान मासिक हप्त्यात प्रतिमाह अग्रीम स्वरुपात PMPML संस्थेस आदा करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१४, दि.१५/०४/२०२४ चे पत्र.

१. PMPML संस्थेस मा. महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र. ३ ठरावान्वये अपवादात्मक बाब म्हणून सन २०२३-२४ मध्ये उचल स्वरुपात आदा करण्यात आलेली रक्कम रु.३० कोटी (अक्षरी रक्कम रु. तीस कोटी) आदा करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची पश्चातमान्यता मिळणेस व सदर सन २०२३ २४ मध्ये SE19A101 ठ इतर खर्चासाठी उचल (advance) या अर्थशिर्षकामधून उचल स्वरुपात आदा करण्यात आलेली रक्कम रु.३० कोटी पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४ २५ च्या अंदाजपत्रकातील " PMPML च्या संचलन तुटी पोटीचा हिस्सा - (RE58A101A) या अर्थशिर्षकामधून परत जमा (Recoupment) करून घेणेस,

२. PMPML संस्थेच्या मागणीनुसार मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र.२ सन २०२३-२४ या वर्षातील अंदाजित संचलनतूट पुणेमहानगरपालिकेच्या (६०%) स्वामित्व हिश्श्यानुसार र.रु.४४०.४२ कोटी होतअसूनत्यापैकीसन २०२३, २४ मध्ये संदर्भ क्र. ३ अन्वये उचल स्वरूपात आदा करण्यात आलेले, रक्कम रु.३० कोटी (अक्षरी रक्कम रु. तीस कोटी) समायोजित करून समायोजनानंतर उर्वरित रक्कम रु.४१०.४२ कोटी (अक्षरी रक्कम रु. चारशे दहा कोटी बेचाळीस लक्ष) पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात (RE58A101A) '४८ अ' पीएमपीएमएलच्या संचलानमधील तुटीपोटीचा हिस्सा' या अर्थशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीमधून माहे एप्रिल २०२४ पासून प्रतिमहा रक्कम रु. ३४ कोटी (अक्षरी रक्कम रु. चौतीस कोटी) याप्रमाणे १२ समान मासिक हप्त्यात ( माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४)पुणे महानगरपालिकेकडून PMPML संस्थेस आदा करणेस,

३. सदर १२ हप्त्यांपैकी ११ हप्ते आदा केल्यानंतर उर्वरित १२ वा हप्ता पुणे महानगरपालिकेच्यामा. मुख्यलेखापरीक्षक यांचेकडून PMPML संस्थेचे सन २०२३-२४ च्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण झालेनंतर, ताळेबंदानुसार निश्चित झालेली कमी/अधिक रक्कमेनुसारपीएमपीएमएल संस्थेस आदा करणेस,

मा. डॉ राजेन्द्र भोसले, प्रशासक – पुढील तीन महिन्याचे ३४–३४ कोटी रूपयांचे तीन हप्ते द्या आणि त्यानंतर त्याचा रिव्ह्यू करून रिवाईज द्यावा.

**निर्णय – सदर विषयामध्ये १२ हप्त्यांपैकी ३ हप्ते अदा केल्यानंतर उर्वरीत रक्कम अदा करणेबाबत मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत पुनरावलोकन करून निर्णय करण्यात यावा.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /– XXX**
**(योगिता भोसले)**
**प्र. नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दि. २६/०४/२०२४ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /– XXX**
**(डॉ राजेन्द्र ब भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**